वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. ११५

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे सा.क्र. ५ यांना शपथ देण्यात आली.**

**नाव – गणेश रामचंद्र बिडवे, वय– २८ वर्षे,**

**व्यवसाय – जे.सी.बी. व ट्रॅक्टर चालक**

**रा. करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर.**

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०५ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

मी जे.सी.बी. व ट्रॅक्टर भाड्याने देण्याचा व्यवसाय करतो. माझे कमलाई अर्थमुव्हर्स नावाचे दुकान आहे. त्याचा मी प्रोप्रायटर आहे. मी प्रतिवादीस ओळखतो. मी त्यांचे प्लॉटींग मध्ये जे.सी.बी. च्या सहाय्याने साफसफाई केलेली आहे. मला साफसफाई करण्याकामी जे.सी.बी.चे भाडे चिंचकर यांनी दिलेले आहे. मी त्यांना दोन पावत्या दिल्या होत्या. त्यांनी मला रक्कम दिली होती. आता मला अभिलेखावरील आर्टिकल अ व ब दाखविल्या. हया त्याच पावत्या आहेत. मी चिंचकर यांना दिलेल्या होत्या. त्यावर माझे हस्ताक्षर आहे. त्या दोन्ही पावती वर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पावत्यांना अनुक्रमे **निशाण क्र. ११६ व ११७** देण्यात येत आहे.

**प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०५ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. आर.व्ही.दिवाण यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

माझेकडे एक जे.सी.बी. व एक ट्रॅक्टर आहे. माझेकडील जे.सी.बी. वरती ऑपरेटर आहे. तर ट्रॅक्टर माझा भाऊ चालवतो. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टर व जे.सी.बी. वेगवेगळया कामासाठी वापरतात. हे म्हणणे खरे आहे की, निशाण क्र. ११६ व ११७ वरील दोन्ही पावत्यावर विशिष्ठ रित्या जे.सी.बी. किंवा ट्रॅक्टर भाडयाने दिलेबाबत स्पष्ट केलेले नाही. प्रतिवादी यांचे काम करण्यासाठी माझा भाऊ गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, पावती वरील गट नं.१९९ हा मी नमुद केलेला आहे. मी वादग्रस्त मिळकतीचा ७/१२ पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी निशाण क्र. ११६ व ११७ वर गट नं. १९९ हा प्रतिवादी चिंचकर यांचे सांगण्यानुसार नमुद केलेला आहे. मी माझे भावाकडे साफसफाई केले नंतर त्या क्षेत्राचा गट नंबर काय होता याबाबत चौकशी केलेली नाही. मी ग्राहकांना पावती दिलेनंतर त्याची पुस्तिका माझेकडे सांभाळत असतो.

वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. ११५

हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या तथाकथीत पुस्तिकेतील पावती प्रतिवादीस दिली आहे, त्याची मुळ पुस्तिका आज रोजी न्यायालयात आणलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादीचे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादीचे चांगले संबंध असल्या मुळे मी त्यांच्या कथना नुसार पावत्या तयार केल्या.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दि. १३–०३–२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा